मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक


epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३४९ वा ● मंगळवार, ता. ०८ जुलै २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## हिंदू मंदिर : सरकारचा हस्तक्षेप थांबवण्यासाठी कटिबद्ध- डॉ. स्वामी

### आषाढीनिमित्त स्वामी पंढरपूरात

**पंढरपूर । प्रतिनिधी**

पवित्र आषाढी एकादशीच्या पर्वकाळात महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या पंढरपूर येथे वारकरी यांचा महामेळावा पार पडला.

या निमित्त माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी पंढरपूर मंदिरात विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले व श्रीसंत ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांचा आशीर्वाद घेतले. यावेळी डॉ. स्वामी यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर महाराष्ट्र सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करण्याची प्रतिज्ञा केली. आपल्या समाजमाध्यमावर पोस्ट करताना त्यांनी स्पष्ट केले की, ''माझी जनहित याचिका सध्या मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

हिंदू मंदिरांच्या व्यवस्थापनातून सरकारचा हस्तक्षेप थांबवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'' तसेच त्यांनी महाराष्ट्र सरकारकडे आवाहन केले की, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने न्यायालयात या भूमिकेला पाठिंबा द्यावा व लवकरात लवकर मंदिर व्यवस्थापन पुजारी, भाविक भक्त आणि वारकऱ्यांच्या हाती सोपवावे. यावेळी डॉ. स्वामींनी ''सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ।'' उल्लेख करत भक्तीभाव व्यक्त केला.

### महाराष्ट्र शासनाचा जीआर घोटाळा

# अहिल्यानगर जिल्ह्यात तब्बल ६.९५ कोटी रुपयांची कामे मंजूर

### १ कोटींची बुऱ्हाणनगरला खिरापत


**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनात बनावट शासन निर्णयांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. मंत्रिमंडळाच्या मंजुरीशिवाय तयार केलेले बनावट निर्णय, त्यावरून काढलेल्या निविदा, आणि कोट्यवधींच्या निधीचा गैरवापर, या प्रकारांनी शासनाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. ही धक्कादायक माहिती आरटीआय कार्यकर्ते व आम आदमी पक्षाचे नेते विजय कुंभार यांनी उघडकीस आणली. याबाबत अधिक माहिती देताना कुंभार म्हणाले, हा फक्त बेजबाबदारपणा नाही तर थेट आर्थिक गुन्हा आहे. शासनाच्या नावाने बनावट निर्णय तयार करून कोट्यवधी रुपये वाटले जात आहेत आणि या प्रकरणात वरपासून खालपर्यंतची संपूर्ण यंत्रणा सामील आहे.

६.९५ कोटींचा बनावट निर्णय!

४ एप्रिल २०२५ रोजी ग्रामविकास विभागाने जारी केलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, ३ ऑक्टोबर २०२४ रोजीचा तथाकथित शासन निर्णय (लेखा शीर्ष २५१५ १३२८ अंतर्गत) पूर्णपणे बनावट होता. याच बनावट निर्णयाच्या आधारावर अहमदनगर जिल्ह्यात तब्बल ६.९५ कोटी रुपयांची विकासकामे मंजूर करण्यात आली होती.

शासनाची स्पष्ट सूचना : या पत्रात खालील बाबी स्पष्ट केल्या आहेत, १) सदर निर्णय अधिकृत नाही. २). कोणतीही पुढील कार्यवाही करू नये. ३). भविष्यात बनावट निर्णयांबाबत विशेष दक्षता घ्यावी. ३). बनावट निर्णय करणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा (FIR) दाखल करावा.



ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०२४/प्र.क्र.२४९/ योजना-६ दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ च्या आदेशासोबतची अनुसूची - २५१५ १२३८ अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील (सा.बां.वि.) विकास कामाची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील यशवतराव होळकर चौक ते आरभ अपार्टमेंट कॉर्नर रस्ता करणे | २५.०० |
| २ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील एस डी स्पोर्ट्स क्लब ते सिद्धिविनायक नगर रस्ता करणे | २५.०० |
| ३ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील सिद्धिविनायक नगर ते जय नगर रस्ता करणे | २५.०० |
| ४ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील आरभ अपार्टमेंट कॉर्नर ते एस डी स्पोर्ट्स क्लब रस्ता करणे | २५.०० |
| ५ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर तुकाराम वाघमोडे ते हिवरे झरे रोड रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ६ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर महादेव मंदिर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ३०.०० |
| ७ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर लक्ष्मण इंगळे यांच्या घर ते रेवण इंगळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ८ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर शिवेश इंगळे याचे घर ते गुंडेगाव रोड रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ९ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर चौधरी याचे घर ते वडगाव रोड रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| १० | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर अनिल वाघमोडे याचे घर ते तुकाराम वाघमोडे याचे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ११ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वडगाव रोड ते विजय देवीकर याचे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ३०.०० |
| १२ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर खंडोबा मळा कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| १३ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर अंबिका मंदिर ते रामदास गवळी घर रस्ता करणे | २५.०० |
| १४ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर स्वस्त धान्य दुकान ते कोरडे मळा रस्ता करणे | २५.०० |
| १५ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर मारुती मंदिर ते अतुल बरवाडे घर रस्ता करणे | २५.०० |
| १६ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वाकोडी मार्केट यार्ड रोड ते इनामदार मळा रस्ता करणे | २५.०० |
| १७ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वाळुंज रोड ते जिल्हा परिषद शाळा रस्ता करणे | २५.०० |
| १८ | मौजे चास ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| १९ | मौजे चास ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे मच्छिंद्र लांडगे घर ते संजय शेलार रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| २० | चिंचोडी पाटील ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| २१ | खडकी ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे नगर दौंड रस्ता ते प्रशांत कोतुळे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| २२ | देवगाव ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| २३ | पोखरी ता. पारनेर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| २४ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे कोल्हेवाडी रस्ता करणे | २०.०० |
| २५ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे रामकाठी मळा रस्ता करणे | १०.०० |
| २६ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे दारकुडे रस्ता करणे | १०.०० |
| २७ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे अंभोरे मळा रस्ता करणे | १०.०० |

तरीही कोणती कारवाई?

या प्रकारात सहभागी दोषींवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही. ना कोणाचा निलंबन आदेश, ना एफआयआर, ना चौकशीचा ठोस निर्णय! केवळ पत्रव्यवहार करून शासनाने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न चालवला आहे.

विजय कुंभार यांची मागणी : ''बनावट शासन निर्णय म्हणजे लोकशाही व्यवस्थेचा खून आहे,'' असे सांगत विजय कुंभार यांनी केलेल्या मागण्या. सर्व बनावट शासन निर्णयांची स्वतंत्र न्यायिक चौकशी करण्यात यावी. दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करावेत व अटक करावी. दोषी अधिकाऱ्यांची नावे जाहीर करावीत. संबंधित मंत्री/आमदार यांनीही जबाबदारी स्वीकारावी. हा प्रकार केवळ सामान्य नोकरशाहीतील चुका नाहीत, तर हा संघटित भ्रष्टाचार आहे. यंत्रणेतील दोषींवर कारवाई होणार का? की पुन्हा एखादं 'दाखल घेण्याचे' पत्र पाठवून प्रकरण थंड केलं जाणार? हे प्रकरण थांबवणं आता अत्यंत आवश्यक आहे. कारण हा केवळ लेखाशीर्षाचा प्रश्न नाही, तर जनतेच्या पैशांचा आणि लोकशाही व्यवस्थेच्या सन्मानाचा प्रश्न आहे.

## बांबोळी नेपाळी क्षेत्र समाजाध्यक्षपदी उर्मिला ओली



**पणजी । प्रतिनिधी**

नेपाळी समाज भारत गोवा राज्य समितीची बैठक दोना पावला येथे उत्साहात पार पडली. आगामी हरतालिका तीज उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजीत या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी गोवा राज्य समितीचे अध्यक्ष प्रकाश ओली होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून संघटनेच्या माजी केंद्रीय अध्यक्षा ईश्वरी भंडारी आणि विशेष अतिथी म्हणून केंद्रीय उपाध्यक्ष भगवती भंडारी उपस्थित होत्या. बैठकीचे आयोजन गोवा राज्य समितीचे सचिव धर्म प्रसाद ओली यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या वेळी धनीप्रसाद खडका (उपाध्यक्ष), कृष्णा बिस्ता (सहसचिव), सीता हमाल (कोषाध्यक्ष), पहल ओली (सदस्य), महेंद्र धामी (मध्यवर्ती गोवा पालिका समिती अध्यक्ष), नंदा राम खडका (नगर समिती कोषाध्यक्ष), ओ बहादुर गोवा (उत्तर नगर समिती सदस्य), तसेच उत्तर प्रदेश समितीचे अध्यक्ष खिमा के.सी. यांची उपस्थिती होती. गोव्याच्या विविध भागांतील नेपाळी समाजबांधव या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत

### २६ ऑगस्ट रोजी हरतालिका तीजचे आयोजन

२६ ऑगस्ट २०२५ रोजी हरतालिका तीज उत्सव गोवा क्षत्रिय मराठा सोसायटी हॉल, मॅजेस्टिक हॉटेलसमोर येथे साजरा करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. यावेळी नेपाळी समाज भारत गोवा राज्य समिती अंतर्गत बांबोळी क्षेत्र समिती स्थापन करण्यात आली. ही समिती मध्य गोवा नगर समितीच्या अध्यक्ष उर्मिला ओली यांच्या नेतृत्वाखाली गठीत करण्यात आली असून तिच्यात १५ सदस्यांचा समावेश आहे. नवीन बांबोळी क्षेत्र समितीमध्ये उर्मिला ओली (अध्यक्ष), निर्मला ओली (उपाध्यक्ष), कृष्णा विश्वकर्मा (उपाध्यक्ष), रूपा बिस्ता (सचिव), दीपा रोका (सचिव), टिका धामी (खजिनदार), तसेच बिना घर्ती, नबीन घरटी, दिला राम विश्वकर्मा, मिना ओली, सुदीप राऊत, सरस्वती विश्वकर्मा, कल्पना रोका, निर्जला रावत आणि लाल बहादूर धामी हे सदस्य म्हणून कार्यरत राहणार आहेत.

## विकसित भारतासाठी सहकार चळवळीला बळ द्या

### राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकारायचे असेल तर विकास सर्वसमावेशक आणि सर्वसामायिक झाला पाहिजे. त्यासाठी सहकार चळवळ अधिक बळकट होणे गरजेचे आहे. सहकार यशस्वी झाला तरच विकास सर्वत्र पोहोचेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. राजभवन येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ आणि केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ''सहकार चळवळीने महाराष्ट्राला प्रगल्भ राजकीय नेतृत्व दिले आहे. भविष्यातही सहकार क्षेत्रातून सक्षम, संवेदनशील आणि प्रामाणिक नेतृत्व घडले पाहिजे. सहकार ही मी ची नव्हे, तर आम्ही ची चळवळ आहे. संघभावनेच्या आधारावरच सहकाराचा विस्तार होतो. व्यक्तिगत स्वार्थ बाजूला ठेवून सहकारासाठी एकत्रित प्रयत्न झाले पाहिजेत,'' असे राज्यपालांनी सांगितले. राज्यपालांनी सहकार क्षेत्रातील यशोगाथांचे उदाहरण देताना गुजरातचा 'अमूल', दिल्लीचा 'मदर डेअरी' आणि कर्नाटकचा 'नंदिनी' या दुध व्यवसायातील ब्रँडचा उल्लेख केला.

# पटक पटक के मारेंगे! उध्दव, राज ठाकरेंना थेट आव्हान

### मराठी जनतेची अवहेलना, रा.स्व.भाजपा खासदार दुबे याचे वादग्रस्त विधान

**मुंबई । प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशचे भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवत थेट आव्हान दिले आहे. त्यांनी म्हटले, ''अगर आप बहुत बड़े बॉस हो तो चलो यूपी-बिहार, पटक पटक के मारेंगे।'' त्यांच्या या विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा वाद निर्माण झाला आहे. मराठी अस्मिता, भाषिक अस्मितेच्या मुद्द्यांवर आधीच तापलेले वातावरण, दुबे यांच्या वक्तव्यामुळे आणखी चिघळले आहे. दुबे यांनी राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना म्हटले की, ''तुम्ही उत्तर भारतीयांवर टीका करता, परंतु आमच्या पैशावरच महाराष्ट्र चालतो.'' त्यांनी उद्धव ठाकरे यांनाही लक्ष्य करत त्यांच्यावर ''सस्ती और क्षेत्रीय राजनीति'' केल्याचा आरोप केला. यापूर्वी मुंबईतील काही ठिकाणी उत्तर भारतीय आणि मराठी समर्थकांमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली होती, त्याच्या पार्श्वभूमीवर दुबे यांच्या विधानाने आग अधिक पेटवली. या विधानानंतर महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले, ''जर हिंमत असेल तर दुबे यांनी स्वतः महाराष्ट्रात येऊन चर्चा करावी. मराठी माणसाचा अपमान खपवून घेतला जाणार नाही.'' मनसेकडूनही प्रतिक्रिया आली असून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी इशारा दिला आहे की, ''मराठी अस्मिता ही भावनात्मक बाब असून तिचा अपमान सहन केला जाणार नाही.'' वसंत मोरे यांनी दुबे यांना खुले आव्हान दिले की, ''हिम्मत असेल तर महाराष्ट्रात येऊन चर्चा करा, आमचं सगळं रेकॉर्ड तयार आहे.'' शिवसेनेच्या (शिंदे गट) आमदार प्रताप सरनाईक यांनी मात्र एक वेगळी भूमिका घेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यावरच टीका केली.

त्यांनी म्हटले, ''हे नेते निवडणुकीत फक्त मराठी भावनेचा वापर करून मतं मिळवण्याचा प्रयत्न करतात. प्रत्यक्षात मराठी जनतेसाठी फारसं काही करत नाहीत.'' राजकीय विश्लेषकांच्या मते, हे विधान आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक अस्मिता आणि भाषिक अस्मितेवर आधारित राजकारणाचा भाग आहे. उत्तर भारतीय विरुद्ध मराठी हा वाद काही प्रमाणात राजकीय फायद्यासाठी उकरून काढला जात असल्याची शक्यता अनेक जाणकारांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, सोशल मीडियावरही हे विधान चांगलेच चर्चेचा विषय बनले आहे. 'मराठी अस्मिता' ट्रेंड करत असून, हजारो युजर्सनी दुबे यांच्या वक्तव्यावर टीका केली आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणी निषेध मोर्चे काढण्याचीही तयारी सुरू आहे.



## इनरव्हिल क्लब अध्यक्षपदी आर्कि.शितल भुतडा

### सेक्रेटरीपदी इंजि. नम्रता मुंदडा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**





इनरव्हिल क्लब ऑफ श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी आर्किटेक्ट शितल चेतन भुतडा तर सेक्रेटरीपदी इंजिनीयर नम्रता संकेत मुंदडा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मावळत्या अध्यक्षा डॉ. शितल अजित घोगरे होत्या. यावेळी उपाध्यक्षपदी राखी बिहाणी, खजिनदार पदी सुरेखा दंड, आय.एस.ओ. पदी ममता गुप्ता, एडिटरपदी शितल कुंदे, सी.एल.सी.सी. पदी सुनिता धुमाळ, सी.पी.सी.सी. पदी श्वेता शाह आणि क्लब सीसी पदी रमा फोपळे यांची निवड करण्यात आली. यावेळी डॉ. वंदना बोरा तसेच क्लबच्या चार्टर्ड प्रेसिडेंट मंगल आढाव यांचीही विशेष उपस्थिती होती. नविन पदाधिकारींचा शपथविधी सोहळा शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल अर्चना, श्रीरामपूर येथे पार पडणार आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून वृंदा देशपांडे, डॉ. ज्योत्स्ना तांबे, प्रिया अग्रवाल, छाया झंवर, भारती काळे, डॉ. संगीता भिटे, नेहा बुब, सुवर्णा दळवी आणि स्नेहा बंग यांची निवड करण्यात आली आहे.



## WE CLUB OF VASHI यांनी दिले शालेय साहित्य

**नवी मुंबई । सोपान आडसरे**

खालापूर तालुक्यातील वावर्ले येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये च्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सामाजिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमातच्या विविध मान्यवर सदस्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना प्रेरणा दिली व उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भूतपूर्व जिल्हाध्यक्ष सुधा कामत, दक्षता मुप्पाना, स्वरूप मुप्पाना, माधवी कोतकर, कविता सेनगुप्ता, शिवकुमार, अभिनव वर्मा, तुलसी, प्रभा शेट्टी व सरिता बाल्हेरा आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुधा कामत म्हणाल्या, ''शिक्षण हीच खरी संपत्ती आहे. अभ्यासात सातत्य ठेवून जीवनात यशस्वी व्हा,'' असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमात सामाजिक कार्यकर्ते जगे काका यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी सातत्याने मदत केली असून सामाजिक बांधिलकी जपली आहे. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका मीनाक्षी चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रास्ताविकात त्यांनी ''देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे'' या ओळींच्या माध्यमातून उपक्रमाच्या मूळ उद्देशावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्याधर गोपीनाथ पाटील यांनी केले. तर संयोजनात योगेश दरेकर, सोपान आडसरे, स्मिता पवार आणि हर्षाली मांडे यांचे मोलाचे योगदान लाभले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा हा उपक्रम अत्यंत सकारात्मक वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.




## विठ्ठलनामात तल्लीन झाल्या विद्यार्थिनी पर्यावरणवारीत रंगला भक्तिरसाचा उत्सव

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

आषाढी वारी म्हणजे भक्तिरसाची गंगाच! वारकरी संप्रदायाच्या या चैतन्यरूपी परंपरेचा अनुभव घेण्यासाठी आणि पंढरीच्या द्वारी विठूरायाला भेटण्याच्या ओढीने श्रीमती मणिबेन एम. पी. शाह महिला महाविद्यालय आणि श्री एम. पी. शाह कला आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी 'विठ्ठलमय पर्यावरण वारीत' रंगून गेल्या. शनिवार, दिनांक ५ जुलै २०२५ रोजी, आषाढी एकादशी निमित्ताने मराठी विभाग, समाजशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रीन क्लब आणि नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. अल्पा दोशी यांच्या अभ्यासपूर्ण प्रास्ताविकाने झाली. विद्यार्थिनींनी स्वरचित कविता, समूहगायन, नृत्य आणि गाणी सादर करत भक्तिरसात रंग भरले. या सादरीकरणांनंतर मराठी विभाग प्रमुख प्रा. नेहा भोसले यांनी ''वारकरी संप्रदाय आणि पर्यावरण'' या विषयावर विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यानंतर, विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत, तुळशी वृंदावन हाती घेत, टाळ-लेझीमच्या गजरात संपूर्ण महाविद्यालयाच्या प्रांगणात विठूच्या नामस्मरणात हरखून गेलेल्या वातावरणात पर्यावरणाची वारी साकारली. ही वारी अनुभवताना महाविद्यालय परिसर भक्तिभावाने न्हाल्यासारखा भासला. या विशेष उपक्रमाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा देताना सांगितले की, ''संतांच्या विचारांचा वारसा आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा पर्यावरणपूरक वाऱ्यांचे आयोजन महाविद्यालयात होणे ही काळाची गरज आहे.'' कला शाखा प्रमुख व ग्रीन क्लब समन्वयक डॉ. हिना शाह यांनीही विद्यार्थिनींच्या सर्जनशील सहभागाचे कौतुक करत कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे ओघवते सूत्रसंचालन कु. मनाली मणचेकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. रश्मी शेट्ये तुपे यांनी केले. या भक्तिभावाने भरलेल्या कार्यक्रमात आणि पर्यावरण वारीत विद्यार्थिनींसह महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# ज्ञानोबा- तुकारामाच्या गजराने दुमदूमले शाहूनगर

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सावेडी गावाजवळील छत्रपती शाहू विकास प्रतिष्ठान व जिजाऊ महिला ग्रुप यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन केले होते. माजी नगरसेविका मनिषा बारस्कर - काळे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या दिंडीचे हे दुसरे वर्ष होते. यामध्ये बालगोपालांपासून ते वृध्द महिला पुरुष सहभागी झाले. शाहूनगरमध्ये सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण होते. प्रत्येकाने आपल्या घरापुढे रांगोळ्या काढल्या होत्या. विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती तुळशीचा हार घालून सजवलेल्या पालखीमध्ये ठेवलेली होती. पालखी घरापुढे आल्यानंतर घरातील सर्वजण मूर्तींची पूजा करत होते. महिलांनी रिंगण धरून फुगड्या घालत होत्या, अभंग म्हणत होत्या, ज्ञानोबा - तुकारामाचा गजर करत संपूर्ण शाहूनगर परिसर भक्तीमय झाला होता. दिंडीमधे शर्मिला कदम, वंदना साबळे, वैशाली काळे, अर्चना चिंचोले, श्रिया देशमुख, वैशाली शिरोळे, हर्षदा चौधरी, विजया साळुंके, जयश्री पवार, शबाना शेख, हेमा पाटील, कविता फ ुंदे, सुनीता गांगर्डे, मंगल शिर्के, अर्चना औटी, राणी औटी, ज्योती पाटील, सुषमा लाळगे, सुषमा कुलकर्णी,स्वाती कुलकर्णी,अर्चना वैद्य, पूनम छाजेड, विजया भोसले, शेळके काकू, केवल आदी सहभागी झाल्या होत्या.

# दिव्यांग मोफत कृत्रिम हातपाय वितरण शिबिराचे आयोजन

## अस्थिव्यंग लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, अहिल्यानगर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय आणि जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय, टिळक रोड यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, ता. ९ जुलै रोजी दिव्यांगांसाठी कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स मोजमाप व मोफत वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबिर सकाळी १० वाजता जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय, टिळक रोड येथे होणार आहे. अस्थिव्यंग दिव्यांगांना आधार व मदत मिळावी या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराचा अस्थिव्यंग लाभार्थ्यांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे प्रमुख प्रशांत गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रप्रमुख डॉ. अभिजीत दिवटे, प्रकल्प समन्वयक दीपक उमाप आणि जानकीबाई आपटे विद्यालयाचे मुख्याध्यापक व तालुका समन्वयक विजय आरोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विजय आरोटे (मो. ९३२५१०१९९४) आणि जी.आर. जाधव (मो. ८६६८५१७५८४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले आहे.



# अक्षय थोरात यांचा आदर्श उपक्रम : होतकरू विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**भिंगार । विष्णू उदे**

येथील श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूलमधे माजी विद्यार्थी अक्षय रमेश थोरात यांनी आपल्या शाळेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना सायकल वाटप केल्या. या स्तुत्य उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य व उत्तर विभागीय सहाय्यक अधिकारी प्रमोद तोरणे होते. मंचावर रमेश थोरात, अक्षय थोरात, संध्या थोरात, मुकुल थोरात, रेवती थोरात, मनीष गायकवाड, पूजा साळवे, यशराज उबाळे, सागर साळवे, नितीन गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी १२ होतकरू विद्यार्थ्यांना उच्च प्रतीच्या सायकली वाटप करण्यात आल्या. अक्षय थोरात यांनी मनोगतात सांगितले की, ''मी सामान्य घरातील असून शाळेबद्दलची आपुलकी म्हणून या सायकली विद्यार्थ्यांना देत आहे. त्यांनी चांगला अभ्यास करून यशस्वी व्हावे हीच माझी इच्छा आहे.'' प्राचार्य प्रमोद तोरणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''पैशाने श्रीमंत अनेक असतात, पण देणगी देणारे हात फार कमी असतात. शाळा अशा दानशूर व्यक्तींना कधीच विसरणार नाही.'' कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. सांस्कृतिक विभागाने त्याचे आयोजन केले होते. प्रा. माधव रेवगडे यांनी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले, तर आभार पर्यवेक्षिका कविता शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# वारकरी परंपरेचा अभ्यास, प्रचार आणि समाज जोडणीसाठी पाचारणे यांचे योगदान अमूल्य- घुले

## अखिल विश्व वारकरी परिषद कार्याध्यक्षपदी पाचारणे यांची निवड

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अखिल विश्व वारकरी परिषद प्रदेश कार्याध्यक्षपदी साहेबराव पाचारणे यांची निवड झाल्याबद्दल जिल्हा हमाल पंचायतच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले की, ''वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची आत्मा असून, संतांचा विचार आणि पांडुरंगाची भक्ती हीच समाज परिवर्तनाची खरी गंगोत्री आहे. पाचारणे यांनी वारकरी परंपरेचा अभ्यास, प्रचार आणि समाज जोडणीसाठी घेतलेले योगदान हे अमूल्य आहे. त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण नगर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे.''

या सत्कार कार्यक्रमात संजय घुले, बापू ठाणगे, दत्ता वामन, नामदेव चांदणे, सुनिल सकट आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना साहेबराव पाचारणे म्हणाले, ''संत परंपरा ही केवळ देवभक्ती नव्हे, तर लोकशिक्षण आणि सामाजिक समतेचे प्रभावी माध्यम आहे. माझी ही निवड माझ्या वैयक्तिक यशाची नाही, तर संपूर्ण वारकरी समुदायाच्या प्रतिनिधीत्वाची आहे. संत तुकाराम, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यांचा वारसा पुढे



नेणे ही माझी जबाबदारी आहे. अखिल विश्व वारकरी परिषदेच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आध्यात्मिक संदेश पोहोचविण्याचे कार्य मी सातत्याने करत राहीन.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू ठाणगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील सकट यांनी मानले.

**ADV. S.M PACHE**
AMS LEGAL CONSLTANTS, GALAXY APARTMENT,
NEAR BY NEW COLLECTOR OFFICE,
GULMOHAR ROAD, AHILYANAGAR

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे खंडाळा, तालुका नगर, जिल्हा अहिल्यानगर येथे गट नंबर २५१/२ मधील एकूण क्षेत्र ९१ आर हे हिंदू कुटुंबाचे मालकीचे अविभक्त क्षेत्र असून यामध्ये अर्जुन जबा वाघ, परिगाबाई जालिंदर वाघ, धनंजय जालिंदर वाघ, शिवाजी जालिंदर वाघ व संभाजी जालिंदर वाघ हे सह- हिस्सेदार आहेत. आमचे अशिल धनंजय जालिंदर वाघ यांना असे समजले की, अर्जुन जबा वाघ हे ऊपरोक्त क्षेत्रापैकी त्यांचा अवीभक्त हिस्सा त्रयस्थ इसमांस विकण्याच्या तयारित आहेत. तरी तमाम जनतेस या नोटिसाव्दारे सूचित करण्यात येते की, सदर अवीभक्त हिस्सा अग्रहक्काने विकत घेण्याचा अधिकार हा आमचे अशिलास आहे. या उपर आपण आमचे अशिलाचा अग्रहक्क डावलून सदर मिळकत विकत घेतल्यास आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यास मुखत्यार असतील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि. ०५/०७/२०२५
ठिकाण - अहिल्यानगर

**ॲड. एस.एम पाचे**
बी.टेक, एलएल.एम. एम.बी.ए.
रजि. नं. एमएएच/१६६/२०१४
अहिल्यानगर

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा, अन्यथा यशवंत डांगेंच्या दालनात कुत्रे सोडू – शेख

**अहमदनगर / प्रतिनिधी**

शहरातील मुकुंदनगर व फकीरवाडा परिसरात मोकाट आणि पिसाळलेल्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात मनपाकडे तोंडी व लेखी स्वरूपात वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

त्यामुळे संतप्त नागरिकांनी माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांच्या नेतृत्वाखाली मनपा आयुक्तांना निवेदन दिले. या निवेदनावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, मुकुंदनगर परिसरातील विविध भागांमध्ये मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांवर, महिलांवर आणि वृद्धांवर हे कुत्रे हल्ले करतात. कुत्र्यांच्या चावण्याच्या अनेक घटना घडत असून, नागरिक दहशतीत जीवन जगत आहेत. निवेदनात पुढे म्हटले आहे की, महानगरपालिका प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घ्यावी व मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.

अन्यथा येणाऱ्या गुरुवारी, ता. १७ जुलै रोजी, मनपा आयुक्तांच्या दालनात कुत्रे सोडून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# झेडपी शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी पालकांचा गौरव

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यवाटप; गुणवंतांचा सन्मान व वाचनासाठी पुस्तके भेट

**नगर तालुका । प्रतिनिधी**

कर्जुने खारे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कृष्णाली फाउंडेशनच्या वतीने एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा सन्मान, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, तसेच सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वाचन प्रेरणेसाठी पुस्तके वाटप करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके होत्या. यावेळी युवा शास्त्रज्ञ डॉ. रणजीत राऊत, सामाजिक कार्यकर्ते डॉ. जयेश कांबळे, उद्योजक अजय लामखडे, भाऊराव गायकवाड, सेवानिवृत्त जिल्हा मेट्रन छाया निमसे, आपला मावळा अध्यक्ष रामेश्वर निमसे, उद्योजक संग्राम आंधळे, शिवाजी उबाळे, माजी उपसरपंच अंकुश शेळके, नवनाथ शिंदे, वजीर शेख, गणेश तोरडमल, मेजर भागवत शेळके, भारत बोबडे, स्वप्नील निमसे, गणेश मोरे, अमर बोबडे, कैलास लांडे आदींसह ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. शाळेतील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या सचिव प्रियांका शेळके यांनी केले. कृष्णाली फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत शेळके यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि मराठी माध्यमातील शाळांना चालना देणे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पहिलीच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन-पेन्सिल किट देऊन स्वागत करण्यात आले. अन्य विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक साहित्य देण्यात आले. वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी महापुरुषांचे चरित्र व गोष्टींची पुस्तके भेट देण्यात आली. लंके यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, ''कृष्णाली फाउंडेशनने समाजाच्या गरजा ओळखून घेतलेला हा उपक्रम खरंच दिशादर्शक आहे.'' छाया निमसे, गेली ३० वर्षे आरोग्य सेवा देत असलेल्या आणि अनेकांना मदतीचा हात देणाऱ्या सेवाभावी व्यक्तिमत्वाचा विशेष सन्मान करण्यात आला. डॉ. रणजीत राऊत यांचा देखील वटवृक्ष देऊन गौरव करण्यात आला. याचबरोबर दहावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात शाळेतील एका विद्यार्थिनीने खासदार निलेश लंके व राणी लंके यांचे काढलेले स्केच भेट दिले. पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांनी फोनवरून संवाद साधत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन कैलास लांडे यांनी मानले. या उपक्रमात उद्योजक सागर गांधी व संग्राम आंधळे यांचे विशेष सहकार्य लाभले.



# भगुरमध्ये पिक विमा सप्ताह संपन्न

## बीमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**शेवगाव । नरहरी शहाणे**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत ''प्रधानमंत्री फसल बीमा सप्ताह'' शेवगाव तालुक्यातील भगुर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भारतीय कृषी विमा कंपनीच्या वतीने शेवगाव तालुका प्रतिनिधी नरहरी शहाणे यांनी शेतकऱ्यांना पिक विमा योजनेविषयी सविस्तर माहिती दिली.

या वेळी मार्गदर्शन करताना नरहरी शहाणे यांनी सांगितले की, ''शेतीत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून बचाव करण्यासाठी आणि शाश्वत शेतीसाठी पिक विमा योजना अत्यंत महत्त्वाची आहे.'' शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे योग्यप्रकारे विमा संरक्षण करून भविष्यातील आर्थिक नुकसान टाळावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भगुर येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयवंताबाई पावसे काळाच्या पडद्याआड

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**



हिवरगाव पावसा येथील शेतकरी कुटुंबातील व वारकरी संप्रदायातील आदर्श माता जयवंताबाई गंगाराम पावसे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.मृत्यू समय त्यांचे वय वर्षे ९७ होते. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. जयवंताबाई पावसे यांनी आयुष्यभर आपल्या काळा आईची शेतीची सेवा केली. आपल्या उमेदीच्या काळात शेतीत नवनवीन कल्पनांचा वापर करून आधुनिक शेती केली. त्यांची दानशूर वृत्ती तसेच धार्मिक,अध्यात्मिक गाण्यांची आवड होती.त्यांच्या पार्थिवावर हिवरगाव पावसा येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. जयवंताबाई पावसे यांनी आपले कष्टातून शेती फुलवली.मुलांचे शिक्षण केले.बागायती शेती असल्याने घरची परिस्थिती चांगली होती,आर्थिक सुबत्ता होती.१९७२ च्या दुष्काळात वेळ प्रसंगी विडी बांधण्याचे काम केले.मुला,मुलींना उच्च शिक्षण दिले.त्यांना शिस्त व संस्काराने घडविले.त्यांचा मुलगा दत्तात्रय पावसे हे इंजिनिअर तर सोमनाथ पावसे हे संगमनेर शहर तालुक्यातील नामांकित वकील आहे. तसेच सिताराम,नामदेव, मधुकर हे प्रगतशील शेतकरी आहेत. पावसे कुटुंबियांच्या शेतामध्ये कोथिंबीर,कांदे,वांगे, टोमॅटो,मका भाजीपाला मोठ्या प्रमाणात घेतला जातो.कुटुंबाकडे ५० ते ६० गायी आहेत.शेतीला जोड व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात करत आहे.प्रगतशील शेतकरी कुटुंब ओळखले जातात. अशा धार्मिक,दानशूर,प्रेमळ, सुस्वभावी यांचा जयवंताबाई पावसे अभिष्टचिंतन सोहळा नुकताच त्यांच्या नाती व मुलींनी मोठा उत्साहात साजरा केला. जयवंताबाई पावसे यांच्या मागे मुले,पुतणे,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी उद्या सोमवार दिनांक ७ जूलै२०२५ रोजी सकाळी ८ वा.हिवरगाव पावसा येथील हनुमान मंदिरासमोरील सभा मंडप येथे होणार आहे.



# बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त मिशन गर्ल्स हायस्कूलमध्ये शालेय साहित्याचे वाटप

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

माजी मंत्री तथा अमरावती जिल्हा बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि श्रीगोंदा प्रहार दिव्यांग संघटनेच्या संयुक्त विद्यमाने मिशन गर्ल्स हायस्कूल, श्रीगोंदा येथील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. प्रहार दिव्यांग संघटनेमार्फत मा. बच्चूभाऊ कडू यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जातो. यंदा विद्यार्थिनींसाठी शालेय साहित्य वाटप हा उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रहार दिव्यांग संघटनेचे आंधळकर, राजेंद्र पोकळे, सुरेश गलांडे, सचिन तोडकर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष माधव बनसुडे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष पीटर रणसिंग, मुख्याध्यापिका भालेराव, शिक्षक सतिष भालेराव, घोडके, शिंदे तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, संघटनेचे कार्यकर्ते, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औरंगाबाद खंडपीठ वकील संघ सदस्यपदी ॲड. विजय काळे यांची निवड

**शेवगाव । ऋषिकेश काळे**



तालुक्यातील लोळेगाव येथील सुपुत्र ॲड. विजय भानुदास काळे पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठ उच्च न्यायालय वकील संघाच्या सदस्यपदाची निवडणूक प्रभावी मताधिक्याने जिंकत मोठा विजय मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकूण १२६८ मतांपैकी ॲड. काळे यांना तब्बल ९७३ मते मिळाली. त्यांच्या या ऐतिहासिक विजयातून वकिलांमध्ये त्यांच्या नेतृत्वगुणांबाबत असलेला विश्वास अधोरेखित झाला आहे. या निवडणुकीचे मुख्य निवडणूक अधिकारी ॲड. प्रल्हाद बचाटे होते. तुलनेने कमी वयात मिळालेल्या या यशामुळे ॲड. काळे यांची प्रामाणिक सेवा, उत्तम लोकसंपर्क आणि कार्यक्षम नेतृत्व या बाबींची पावती मिळाली आहे. गेल्या तीन वर्षांपासून ॲड. काळे औरंगाबाद खंडपीठात वकिल म्हणून कार्यरत असून, समाजातील गरीब, वंचित व न्यायासाठी लढणाऱ्या घटकांसाठी सातत्याने कार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्यामुळे विविध स्तरांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. ते लोळेगावच्या विद्यमान सरपंच सुनीता भानुदास काळे यांचे चिरंजीव असून, आपल्या यशाचे श्रेय त्यांनी आपले गुरुजन, सहकारी व मतदार यांना दिले आहे.

विजयानंतर मनोगत व्यक्त करताना ॲड. काळे म्हणाले, ''ही निवड माझ्यासाठी सन्मानासोबतच अधिक जबाबदारीही देणारी आहे. समाजाच्या हितासाठी काहीतरी सकारात्मक घडवण्याची ही संधी आहे. हा विजय माझ्या गुरुजनांचा, सहकाऱ्यांचा आणि प्रत्येक मतदाराचा आहे.'' या निवडीमुळे लोळेगाव ग्रामस्थांसह संपूर्ण शेवगाव तालुक्यात अभिमानाची लाट उसळली आहे.



# कौशल्याधारित शिक्षणातून स्वत:चा उद्योग सुरु करणे शक्य- डॉ. बोडके

**राहुरी । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांनी अलीकडेच अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांबा येथील शासकीय कृषि तंत्र विद्यालयाला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी कौशल्याधारित शिक्षणाच्या महत्त्वावर भर दिला. ''कृषि तंत्र शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी संधी आहे. आपल्या देशात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्र आत्मसात करून स्वतः चा उद्योग सुरू करणे शक्य आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती व शेतीपूरक व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळवता येते,'' असे मत डॉ. बोडके यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्य डॉ. पंडित खर्डे यांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. त्यानंतर डॉ. बोडके यांनी विद्यार्थी व्याख्यान कक्ष, बीज प्रक्रिया केंद्र व प्रक्षेत्रावरील सोयाबीन बीजोत्पादन प्लॉटला भेट दिली. यावेळी विद्यालयाच्या आवारात वनमहोत्सव कार्यक्रम २०२५ च्या औचित्याने वृक्षारोपणही करण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे, सोमनाथ लंघे, किशोर भाकरे, दिनेश पंडित, अंबादास इंगळे व सचिन राऊत यांची उपस्थिती होती. डॉ. बोडके यांनी विद्यालयातील कार्य आणि उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले.

# पाथर्डीच्या सुपुत्राचा मुंबईत गौरव

## परळ चौकाला स्व. बाबुराव भापसे यांचे नाव

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी सारख्या दुष्काळी भागातून येत, परिश्रम, धडाडी आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर मुंबईसह संपूर्ण राज्यात स्वतः ची वेगळी ओळख निर्माण करणारे माजी आमदार स्व. बाबुराव भापसे यांचे योगदान कामगार चळवळीत अतुलनीय आहे.



त्यांच्या स्मृतींच्या सन्मानार्थ परळ (मुंबई) येथील गजबजलेल्या चौकाला स्व. बाबुराव भापसे चौक असे नाव देण्यात आले असून, या उपक्रमामुळे कामगार वर्गासह पाथर्डी तालुक्याचाही गौरव झाल्याचे मत संस्कृती कार्यमंत्री आशिष शेलार यांनी व्यक्त केले. स्व. भापसे यांनी हुतात्मा बाबू गेनू विद्यापीठाची स्थापना सुमारे ४५ वर्षांपूर्वी केली होती. या अंतर्गत कोकण व पाथर्डी तालुक्यात नऊ माध्यमिक शाळा, एक इंग्लिश मीडियम स्कूल व दोन कॉलेजेस सुरू करण्यात आले. कामगार चळवळीला प्रभावी रूप देत त्यांनी संपूर्ण मुंबईत आपला दबदबा निर्माण केला होता. १९९० साली टॅक्सी संघटनेतर्फे झालेल्या संपामुळे राज्य सरकारलाही हस्तक्षेप करावा लागला होता. १९८३ ते १९८८ या कालावधीत ते विधान परिषदेचे आमदार होते. त्यांच्या प्रभावामुळे अनेक लोकप्रतिनिधीही त्यांच्यासमोर बोलण्याआधी विचार करत असत, अशी आठवण या प्रसंगी व्यक्त करण्यात आली. परळ येथील रविवार चौकाला स्व. बाबुराव भापसे यांचे नाव देण्याचा समारंभपूर्वक कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, सामाजिक कार्यकर्त्या नीता लाड, भाजप जिल्हाध्यक्ष नीरज उभारे, मिनेश लाड, तसेच विविध पक्षीय व सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते व कामगार क्षेत्रातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री आशिष शेलार म्हणाले, ''मुंबईसारख्या महानगरात एका दुष्काळी भागातील कार्यकर्त्याच्या नावाने चौक नामांकित केला जाणे ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. ही केवळ स्मृती नाही, तर प्रेरणा आहे. गोवा मुक्ती संग्रामात सहभाग घेतल्यानंतर त्यांनी आयुष्य देशसेवेसाठी वाहून घेतले. गोरगरीब, कष्टकरी, विस्थापित वर्गासाठी त्यांनी संघर्ष करत न्याय मिळवून दिला. त्यांच्या कार्यातून अनेकांनी प्रेरणा घेतली आणि कामगार चळवळीत योगदान दिले.'' पाथर्डीतही त्यांनी प्रस्थापितांशी संघर्ष करत दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांना संधी देत राजकीय समीकरणात महत्त्वाचा बदल घडवून आणला, असेही शेलार यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार प्रसाद लाड यांनी केले तर आभार शुभम लाड यांनी मानले.

# अभिनेते, क्रिकेटर म्हणतात 'गुटखा खा, जुगार खेळा'



आपल्या देशात जर सर्वाधिक (चाहते) फॅन फॉलोअर्स कोणाचे असतील तर ते चित्रपटात काम करणारे अभिनेते आणि क्रिकेट खेळणाऱ्या क्रिकेट खेळाडूंचे. कारण चित्रपट आणि क्रिकेट हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सिनेमा आणि क्रिकेट शिवाय भारतीयांचे जीवन अपूर्ण आहे. एकप्रकारे सिनेमा आणि क्रिकेट हे भारतीयांचे श्वास आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. क्रिकेट तर आपल्याकडे धर्म मानला जातो आणि काही प्रेक्षक चित्रपट अभिनेत्यांना देव मानून त्यांची पूजा करतात. दक्षिणेत तर अनेक अभिनेत्यांची मंदिरे देखील उभारुन त्यांची पूजा केली जाते. भारतीयांच्या दृष्टीने चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर म्हणजे सर्वस्व म्हणूनच त्यांचे लाखो चाहते आपल्या देशात आढळतात. विशेषतः तरुण वर्ग तर चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांना आपला आयडॉल मानतात. त्यांच्या प्रमाणे दिसायचा, वागायचा, वेशभूषा, केशभूषा करण्याचा प्रयत्न करतात. हे सिलिब्रेटी सांगतील त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करत असतो त्यामुळे चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांची जबाबदारी आणखी वाढते. जर तरुण वर्ग आपले अनुकरण करत असतील तर आपली वर्तणूक आदर्शवत असली पाहिजे. आपल्या वर्तणुकीतून किंवा आपण करत जाहिरातीतून तरुणांना चांगला संदेश गेला पाहिजे याची दक्षता या सिलिब्रेटींने घ्यायला हवी मात्र अलीकडे पैशासाठी चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर आपली ही जबाबदारी विसरत चालले आहेत. जो तरुण वर्ग आपल्याला फॉलो करतो, आपल्याला आदर्श मानतो त्यांना आपण पैशासाठी काय करायला लावत आहोत याचेही भान या सिलिब्रेटींना राहिले नाही. आता हेच पहा ना ज्या चित्रपट अभिनेत्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करतो तेच चित्रपट अभिनेते गुटख्याची जाहिरात करून तरुण मुलांना गुटखा खाण्यास सांगत आहेत. शाहरुख खान, अजय देवगण, अक्षय कुमार यासारखे हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार गुटख्याची जाहिरात करतात आणि तरुणांना गुटखा खाण्यास सांगतात. अभिनेते पैशासाठी चुकीची जाहिरात तरुण वर्गाला व्यसनाकडे वळवत आहेत तसेच क्रिकेटरही करत आहेत. वास्तविक क्रिकेटर हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. परदेशात गेल्यावर त्यांना आपल्या देशाचे राजदूत म्हणून ओळखले जाते. तरुण वर्गही क्रिकेट खेळाडूंचे अनुकरण करत असतात. तेच देशाचे राजदूत असलेले क्रिकेट खेळाडू पैशासाठी ऑनलाइन जुगाराची जाहिरात करत आहेत. ऑनलाइन जुगारामुळे तरुण वर्ग जुगारी तर गुटख्यामुळे व्यसनी होत आहे. आजचा तरुण हा उद्याचा नागरिक आहे. देशाचे भवितव्य तरुणांवर अवलंबून आहे हे माहीत असूनही अशाप्रकारची जाहिरात करून तरुण वर्गाला व्यसनी आणि जुगारी बनवण्याचे काम हे सिलिब्रेटी करत आहेत हा एकप्रकारचा देशद्रोहच आहे. चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर पैशासाठी अशाप्रकारचा देशद्रोह करून तरुणांचे आयुष्य उध्वस्त करत असतील तर त्यांना आदर्श का म्हणावे. अजूनही वेळ गेलेली नाही चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांनी गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगाराची जाहिरात करणे थांबवावी. पैशासाठी आपण तरुण पिढीसमोर कोणता आदर्श ठेवत आहोत याचा विचार या सिलिब्रेटींनी करावा. तुम्ही देशातील सन्माननीय नागरिक आहात. देशातील लाखो नव्हे तर करोडो नागरिक तुम्हाला आपला आदर्श मानतात त्याला तडा जाईल असे वागू नका. देशासाठी आणि देशातील तरुणांप्रति तुमचीही काही जबाबदारी आहे याचे भान ठेवून गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगारच्या जाहिराती बंद करा आणि तरुणांपुढे आदर्श निर्माण करा.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**



# मुगाव विद्यार्थ्यांची साक्षरता व वृक्षसंवर्धन दिंडी

## पर्यावरण, अध्यात्म आणि साक्षरतेचा सुरेख संगम

**दौंड । श्याम ठाणेदार**

येथील मुगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड करत एक अनोखी वृक्षसंवर्धन व साक्षरता दिंडी साजरी केली. पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी प्रतिकात्मक पालखी शाळा परिसरातून काढत ज्योतिबानगर येथे प्रस्थान केले. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी हातात साक्षरतेचे व पर्यावरण रक्षणाचे फलक घेऊन संपूर्ण गावात जनजागृती केली. मुलींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेतले होते, तर मुलांनी टाळ–मृदंगाच्या गजरात ''विठ्ठल–विठ्ठल'' असा जयघोष करत दिंडीत सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी विठ्ठल भक्तीमय अभंग गात गावातून पालखीची मिरवणूक काढली. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. पारंपरिक वारकरी वेशभूषा, भगवा ध्वज, अभंग, नृत्य व फुगडी अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांनी साक्षरता आणि पर्यावरणसंवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहोचवला. या उपक्रमामुळे पर्यावरण, साक्षरता आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम सर्व ग्रामस्थांना अनुभवता आला. दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना ग्रामस्थ व पालकांकडून अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या उपशिक्षिका रूपाली शिंदे व शाळा व्यवस्थापन समिती यांनी विशेष परिश्रम घेतले. मुख्याध्यापक दत्तात्रय शिंदे यांनी सर्व पालक व ग्रामस्थांचे आभार मानले. तसेच, देऊळगाव राजे केंद्राच्या केंद्रप्रमुख वैशाली जानराव यांचे मार्गदर्शन लाभल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# पाण्यासंदर्भात सतर्कता बाळगण्याचे श्रीरामपूर नगरपालिकेकडून आवाहन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

आवर्तन लांबल्यामुळे तलावातील डेड स्टॉक वापरून पाणी पुरवठा करणेत आला आहे. त्यामुळे काही भागात पाण्याच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आहेत. त्यामध्ये पुढील दोन दिवसांत सुधारणा करण्यात येईल. सध्या कालव्याद्वारे आवर्तन सुरू असून साठवण तलावात पाणी घेण्यात येत आहे. आलेले पाणी हे सुरू असलेल्या पावसाचे पाणी आहे,यावर आवश्यक प्रक्रिया करून नगरपरिषद नागरिकांना पाणी पुरवठा करणार असून नागरिकांनी देखील खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासक तथा प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील आणि मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी केले आहे. नागरिकांनी दैनंदिन पाण्याचा वापर करताना आपापल्या नळांना तोट्या बसवाव्यात, कुंडीतील/ खड्ड्यात असणाऱ्या नळ जोडणीला पाणी भरून झाल्यावर बंद करावे अन्यथा या मधुन डास,किडे, पावसाचे पाणी पाइपलाइन मध्ये प्रवेश करतात त्यामुळे अशुद्ध पाणी पुरवठा होतो आपल्या घरावरील टाक्यांची नियमित साफसफाई करावी.परिसरांत कुठेही पाणी गळती आढळल्यास नगर परिषदेकडे संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पावसाचे दिवस असल्याने पाणी गाळून व उकळून घ्यावे, पाण्यामध्ये मेडिक्लोर चा वापर करावा.पावसामुळे विद्युत पुरवठा खंडित होऊन पाणी पुरवठा विस्कळीत होऊ शकतो म्हणून पाण्याच्या जपून वापर करावा. नगर परिषद आपले स्तरावर काळजी घेत असून नागरिकांनी देखील सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, नागरिकांनी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा काटकसरीने वापर करून नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप व प्रशासक श्री.किरण सावंत पाटील तसेच पाणीपुरवठा विभागाचे अभियंता निलेश बकाल पाटील यांनी केले आहे.

# मुलुंडच्या बालवारकऱ्यांनी विठ्ठलभक्तीत भरले रंग




**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

इंडियन एज्युकेशन सोसायटी मराठी प्राथमिक शाळा, मुलुंड (पूर्व) येथे आषाढी एकादशी निमित्त भक्तिरसपूर्ण आणि उत्साहाने भरलेली दृश्ये पाहायला मिळाली. ''आषाढी वारी आली शाळेच्या दारी'' या भावसंपन्न घोषवाक्याला साजेसा आनंदोत्सवइयत्तापहिलीतेचौथीच्याविद्यार्थ्यांनीमोठ्याउत्साहानेसाजराकेला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी पोशाख परिधान केला, विठू नामाचा गजर करीत दिंडीत सहभागी झाले, रिंगण घातले आणि फुगड्यांचा मनमुराद आनंद लुटला. संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाल्यासारखा भासला. या दिंडी सोहळ्यात पालकांनीही उस्फूर्त सहकार्य करत विद्यार्थ्यांच्या आनंदात भर घातली.कार्यक्रमाची संकल्पना साकारण्यासाठी आणि यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता अनभुले तसेच सतीश डोंगरे, मृणाली तावडे, सुरेखा पाटील आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. लहानग्यांच्या टाळ–मृदंगाच्या नादात आणि विठ्ठलनामाच्या गजरात पार पडलेला हा वारी सोहळा विद्यार्थ्यांच्या मनात अध्यात्म, परंपरा आणि संस्कृतीची बीजे पेरणारा ठरला.

# जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांच्या समाजाभिमुख कार्याचा सन्मान

**नगर। प्रतिनिधी**



अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन सामाजिक कार्यकर्ते संतोष कानडे यांनी पुस्तक भेट देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला.

नुकतेच रुजू झालेले जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांनी पोलीसांबद्दल समाजात प्रतिमा उंचावण्यासाठी उत्कृष्टपणे कार्य सुरु केलेले आहे. पोलीसांबद्दल असलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी ॲपच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला संधी उपलब्ध करुन दिली. तर सर्वसामान्यांचे प्रश्न देखील सोडविण्याचे काम प्राधान्याने होत असल्याचे संतोष कानडे यांनी सांगितले. तसेच पुस्तक भेट उपक्रमाची त्यांनी माहिती दिली. पोलीस अधीक्षक घार्गे यांनी सामाजिक जीवनात प्रत्येकाने साहित्याचे वाचन केले पाहिजे. साहित्यातून जीवनाचा खरा उलगडा होतो, इतरांचे विचार आणि अनुभव मार्गदर्शक ठरतात. सृजनशील समाज घडविण्यासाठी साहित्य वाचन महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगून, उपक्रमाचे कौतुक केले. कानडे यांनी वाढदिवस, स्नेहभेट, राष्ट्रीय सण–उत्सव, राष्ट्रपुरुष जयंती, पुण्यतिथी निमित्ताने शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये यांना पुस्तक भेट देऊन वाचन संस्कृती जोपासण्यासाठी ५०० पुस्तके भेट दिली आहेत.

# सत्यशोधक बहुजन आघाडीच्या सिद्धार्थनगर आणि लालटाकी शाखा समित्या जाहीर

**अहमदनगर । प्रतिनिधी**




सत्यशोधक बहुजन आघाडीच्या सिद्धार्थनगर आणि लालटाकी शाखा समित्यांची अधिकृत घोषणा नुकतीच करण्यात आली. या निवडीतून स्थानिक नेतृत्वाला चालना देत संघटनात्मक बांधणीस बळकटी देण्यात आली आहे. सिद्धार्थनगर शाखा समिती सिद्धार्थनगर शाखेच्या अध्यक्षपदी शेखर वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली असून विजय भारस्कर उपाध्यक्ष, अशोक साठे सचिव, राहुल शेकटकर कार्याध्यक्ष, उमेश दिनकर सहसचिव, लक्ष्मण शिंदे संघटक आणि संजय ससाणे सल्लागार म्हणून निवड करण्यात आली आहे. लालटाकी शाखा समिती लालटाकी शाखेच्या अध्यक्षपदी सचिन सुनील शेलार यांची निवड झाली आहे. चेतन पावलस पवार उपाध्यक्ष, डॉ. प्रवीण खरात सचिव, अजित वसंत पवार खजिनदार म्हणून तर किशोर पवार यांची शहराचे सहसंघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष सुनील ढोले यांच्या हस्ते व शहर समिती सदस्य शाम वैराळ, जालिंदर शेलार, योगेश साबळे, रुपेश जगधने, राहुल ठोकळ आदींच्या उपस्थितीत निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास सत्यशोधक बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष सचिन बगाडे आणि जिल्हाध्यक्ष संदीप सकट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली समित्यांचे गठन करण्यात आले. याप्रसंगी नागेश गायकवाड, अरविंद पाटोळे, के. राजगुरू यांनी नूतन पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. सचिन बगाडे यांनी कार्यकर्त्यांना ''जोमाने कार्यास लागा'' असे आवाहन करताना दलित–आदिवासी विकास निधीच्या गैरवापरावर चिंता व्यक्त केली आणि या संदर्भात स्वतंत्र कायद्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी या प्रश्नासाठी संघटित लढ्याचे आवाहन केले. जिल्हाध्यक्ष संदीप सकट यांनी सत्यशोधक बहुजन आघाडीची विचारधारा, गरज आणि कार्यदिशा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम वैराळ यांनी तर उत्तरार्धात कार्यकर्ता शाहीर प्रवीण सोनवणे यांनी त्यांच्या जोशपूर्ण सत्यशोधकी ललकारींनी वातावरण भारावून टाकले. या प्रसंगी अहमदनगर शहर समितीच्या कार्यालयाचे उद्घाटन बगाडे सरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचा समारोप कामगार, कष्टकरी, दलित–आदिवासी समाजाच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करत शिक्षण, रोजगार व सामाजिक न्याय या मुद्द्यांवर पुढील कार्य करण्याचा निर्धार करत करण्यात आला.

## जसा विचार, तसा जीवनाला आकार,

# तुमचे भाग्य तुमच्या विचारातच दडलेले- गोरे



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

''जसा विचार तसा जीवनाला आकार, विचार बदला नशीब बदलेल. प्रयत्न हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहेत. शरीर हे संगणकासारखे असून त्याला योग्य 'फिडिंग' हवे. सकस आहार, व्यायाम, चांगली संगत आणि सातत्यानं ज्ञानार्जन केल्यास यश हमखास मिळते,'' असे प्रेरणादायी विचार एअर इंडिया कंपनीचे सेवानिवृत्त असिस्टंट मॅनेजर पांडुरंग गोरे यांनी व्यक्त केले. लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालयात आयोजित कार्यक्रमात गोरे आणि मुंबई विद्यापीठाचे सहाय्यक ग्रंथपाल शशिकांत तानवडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या कार्याची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रनिष्ठ विचार, नीतिमूल्ये आणि शिक्षणाचे खरे उद्दिष्ट यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना गोरे म्हणाले, ''शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर संस्कारही असतात. संगत ही चांगल्या विचारांशी असावी. अभ्यासाला कंटाळा येतो म्हणजे नशिबालाही कंटाळा येतो. म्हणून अभ्यासात सातत्य ठेवा, एक दिवस तो तुमचे भविष्य घडवेल.'' यावेळी त्यांनी स्वतः व्यसनमुक्तीवर आधारित गीत सादर करत 'गुटखा, पान, तंबाखू, दारू' पासून दूर राहण्याचे आवाहन केले. गाण्यातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करून त्यांनी निसर्गनियम, प्रार्थनेचे महत्त्व आणि सकारात्मक विचारसरणीबाबतही सल्ला दिला. ''रात्र झोपताना वाईट विचार नकोत. प्रार्थना करा, कारण ती आत्मिक समाधान देते आणि बौद्धिक क्षमताही वाढवते,'' असा मौलिक सल्ला देत गोरे यांनी विद्यार्थ्यांचे मन जिंकले.कार्यक्रमास विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन उपशिक्षक तुषार नागवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कलाशिक्षक अभिषेक उदमले यांनी मानले.